कुटुंबात, समाजात राष्ट्रात महत्व असते ते माणसाच्या माणुसकीला ही माणुसकी जीवनमूल्यातून साकारते. हे साकारणे प्रत्येक काळात घडत असते. काळ बदलतो, परंतु मूल्ये बदलली तरी जगण्याची व जगवण्याची कल्पना नष्ट होऊन चालत नाही. ती नष्ट झाल्यास माणसाची सर्व दृष्टीने अधोगती होणे निश्चित आहे. या मानसिक अधोगतीतून केवळ जीवनमूल्येच माणसाला वाचवू शकतात. कारण हीच मूल्ये माणसाच्या जीवनाला आकार देत असतात. हा आकार दिला जातो तो संस्कारातून. अशाच संस्कारातून संस्कृती साकारत असते. माणसाचे आचार, विचार व उच्चार यातून संस्कृतीचे दर्शन घडत असते. राष्ट्र सुसंपन्न, नीतीसंपन्न, किर्तीसंपन्न घडवायचे असेल तर व्यक्तिकेंद्रीत विकासाचा दृष्टीकोन ठेवावाच लागेल. कारण व्यक्ती सर्वगुणसंपन्न झाली तर समाज तसाच होईल आणि समाजाच्या संपन्नतेतुनच राष्ट्राची संपन्नता वाढीस लागेल. या चक्रांचे व्यापकत्व जपण्यासाठी माणसाचे माणुसपण प्रथम जपावे लागेल आणि हे जपण्यासाठीच जीवनमूल्यांची जपवणूक महत्वाची ठरते.

**प्रस्तावना**

आजच्या सामाजिक अधोगतीच्या काळात नैतिक मूल्यांचा विकास व त्यांचे शालेय जीवनातील महत्त्व टिकून राहीले पाहीजे. शालेय जीवनातील प्रत्येक उपक्रमांत त्यांचा समावेश व्हायला हवा. चार भिंतीच्या आत दिल्या जाणाऱ्या पुस्तकी शिक्षणाबरोबरच स्काऊट गाईड या विषयातून मूल्य विकसन प्रभावीपणे होऊ शकते. त्या दृष्टीने शाळेत स्काऊट गाईड या विषया द्वारे मूल्यांची रुजवणूक करणे अत्यंत महत्वाचे आहे.

विषय प्रवेश

शिक्षणाचे प्रमुख उद्दिष्ट विद्यार्थ्यांच्या ' व्यक्तिमत्वाचा सर्वांगिण विकास' करणे होय. व्यक्तिमत्वाच्या विविध अंगाचा संतुलित विकास व्हावा म्हणून अध्ययन अध्यापन प्रक्रियेच्या सर्व स्तरावरील विद्यार्थ्यांच्या वयानुरूप विविध विषयांचा समावेश अभ्यासक्रमामध्ये करण्यात आलेला आहे. सुसंस्कारित व जबाबदार नागरिकत्वाकरिता सामाजिक शास्त्रे आणि मूल्यशिक्षण, निसर्गप्रती जवळीकता निर्मितीस्तव पर्यावरण शिक्षण, भाषा विकासातून व्यक्तिविकास साधावा म्हणून भाषा विषय, वैज्ञानिक दृष्टीकोनाची आवश्यकता म्हणून विज्ञान, दैनंदिन जीवनाची सांगड व्यवहाराशी घालण्यासाठी गणित कौशल्य विकसनासाठी कला,संगीत,समाजसेवा, शारीरिक शिक्षण व स्काऊट-गाईड अशा अनेक विषयांचा समावेश माध्यमिक स्तरावरील अभ्यासक्रमात करण्यात आलेला आहे. महाराष्ट्र शासनाने सन १९७२ पासून महाराष्ट्रात 'स्काऊट-गाईड' या विषयाचा समावेश माध्यमिक स्तरावरील अभ्यासक्रमात केलेला आहे.

भूतकाळापासून आजपर्यंत शिक्षण क्षेत्रात अनेक परिवर्तने झालीत. प्रारंभीच्या गुरुकुल शिक्षण पध्दतीपासून आजच्या संगणकीय शिक्षण पध्दतीपर्यंत शिक्षणाचा प्रसार आणि विस्तार झपाट्याने विस्तृत होत राहीला. यासोबतच शिक्षणाच्या संकल्पनाही बदलत गेल्यात. परंतु तरिही शिक्षणातून ' संस्कार' ही मुलभूत अपेक्षा मात्र कायम राहिली, शिक्षणाच्या बाबतीत कधी 'जुने ते सोने ' तर कधी नवे ते हवे ' वाटले. या कुत्वामध्ये नव्याचे आव्हान पेलण्याचे सामर्थ्य स्काऊट-गाईड या विषयात आहे. आजच्या स्पर्धेच्या युगात विद्यार्थ्यांना चार भिंतीच्या मर्यादित राहून शिक्षण देणे पुरेसे ठरत नाही. केवळ स्मरण किंवा पाठांतरावर भर देऊन विद्यार्थ्यांचा सर्वांगिण विकास साधने कदापीही शक्य होणार नाही, हे अगदी स्पष्ट आहे. दैनंदिन जीवनात अचानकपणे उद्भवलेल्या समस्यांना तोंड देण्याचे सामर्थ्य शिक्षणामुळे विद्यार्थ्यांच्या अंगी आले पाहिजे. विद्यार्थ्यांमध्ये प्रचंड आत्मविश्वास निर्माण होणे आवश्यक आहे याकरीता त्यांच्यात आत्मविश्वास वृध्दींगत होईल असे कृतीयुक्त शिक्षण देणे, नव्हे तर प्रत्यक्ष शैक्षणिक अनुभव देण्याची खरी गरज आहे.

**स्काऊट - गाईड विषय**

महाराष्ट्र राज्य भारत स्काऊटस् गाईडस् यांचा अभ्यासक्रम तीन वर्षाचा हा अभ्यासक्रम पाचवी ते दहावी विद्यार्थ्यांसाठी

E- ISSN 2582-5429
Akshara Multidisciplinary Research Journal
Peer-Reviewed & Refereed International Research Journal
January-March 2022 Volume 3 Issue III SJIF Impact- 5.54

असून पाचवी ते सातवी हा एक गट आणि आठवी ते दहावी हा एक गट अशी विभागणी आहे. पाचवीत किंवा आठवीत पहिल्या वर्षी प्रवेश त्यातील प्रवेश पाठ्यक्रम तीन महिन्याचा असून त्यात स्काऊट-गाईड चळवळीचा मूळ इतिहास, स्काऊट-गाईडचे नियम व वचन, ध्येय, खुण, वंदन, हस्तांदोलन, सत्कृत्य (दररोज एक), स्काऊट-गाईडचा गणवेष, राष्ट्रध्वज, स्काऊट-गाईड ध्वज, जागतिक स्काऊट-गाईड ध्वज, प्रार्थना व झंडागीत, राष्ट्रगीत चालीवर म्हणता येणे, युनिटच्या चार मेळाव्या या घटकांचा समावेश आहे.

स्काऊट-गाईड विषयांतर्गत आगळे-वेगळे उपक्रम

'स्काऊट-गाईड' हा एक आनंददायी खेळ आहे. तो सामान्यतः वर्गाच्या चार भिंतीबाहेर शिकविला जातो. विद्यार्थी-विद्यार्थीनींवर प्रत्यक्ष जबाबदारी टाकून त्यांचे माध्यमातून हा विषय संघपध्दतीने शिकविला जातो. नेहमीच्या शालेय आणि सहशालेय विषयांच्या तुलनेत या विषयामध्ये विद्यार्थ्यांच्या कल्पकतेला आणि कार्यक्षमतेला अधिक वाव आहे. हसत बागडत, खेळता-खेळता शिकायचे आहे आणि त्यातूनच आपला सर्वांगीण विकास साधायचा आहे.

या विषयामध्ये काही बाबी अगदी वेगळ्याच आहेत. त्या पुढील प्रमाणे

**१) मेळावे व शिबिरे- स्काऊट**-गाईड शिक्षण मोकळ्या व खुल्या वातावरणातील मैदानावर व निसर्गसानिध्यात प्रत्यक्ष कृतिद्वारे आनंददायी पध्दतीने घ्यावयाचे असते. म्हणून मेळावे तथा शिबिरे याचे महत्व या शिक्षणात अधिक उपयुक्त ठरते.

अ) संघमेळावा- स्काऊट-गाईड शिक्षणात ६ ते ८ स्काऊटस्-गाईडस् चे संघ असतात. हे स्काऊटस् किंवा गाईडस् आपल्या संघाचा निसर्गसानिध्यात, बगीच्यात किंवा शाळेच्या मैदानावर छोटेखानी मेळाव्याचे आयोजन करीत असतात.

(ब) शाळास्तरीय स्थानिक मेळावा- जवळच्या निसर्गरम्यस्थळी किंवा इतर सोयीच्या ठिकाणी अशा मेळाव्याचे आयोजन केले जाते.या ठिकाणी मुले-मुली संपूर्ण स्वावलंबी जीवन जगतात. परस्परांना समजावून घेतात, एकत्रित काम करतात आणि मनोरंजनात्मक सांस्कृतिक कार्यक्रमात सहभागी होतात. मेळाव्यामध्ये आयोजित अभ्यासक्रमावर आधारित विविध स्पर्धा व इतर स्पर्धा कार्यक्रम व नाविन्यपूर्ण उपक्रम यामध्ये सहभागी होतात.

(क) निसर्गनिवास शिबिरे व इतर- स्काऊटस् आणि गाईडस् यांना प्रत्यक्षपणे निसर्गाशी एकरूप होता यावे, निसर्गदत्त प्रेरणेतून काही शिकता यावे, यासाठी एक दिवस किंवा दोन दिवस निसर्गनिवास शिबिरे हा स्काऊट-गाईड शिक्षणातील महत्वाचा भाग आहे. आरोग्य, स्वावलंबन, आत्मविश्वास अनेक कौशल्य आणि चातुर्य या गोष्टी मुलांना शिकण्याची पूर्ण संधी असते. शिबिर हा अभ्यासक्रमाचाच एक भाग असून स्काऊट-गाईड जे जे शिकले असतात, ते ते प्रत्यक्ष अनुभवण्याची संधी, कृती करण्याची वेळ यासाठी ८२ शिबिराचे प्रयोजन असते. स्वेच्छेने शिबिरामध्ये सहभागी होणारी मुले-मुली उत्साही, तत्पर, निरोगी, कृतिशील व कौशल्य प्रदर्शित करणारी असतात. शिबिरे, मेळावा वा जांबोरी मध्ये तंबूमध्ये निवास असतो.

**२) स्काऊट-गाईड चे खेळ**- स्काऊट-गाईड शिक्षणात खेळांना विशेष महत्व दिले जाते. किंबहूना खेळातूनच या शिक्षणाची सुरूवात होते. खेळातून शिस्त, प्रामाणिकपणा, संयम, आज्ञाधारकपणा, नेतृत्वगुण, तळमळ, संघप्रवृत्ती इत्यादी गुणांचा विकास होतो. गायन, वादन, नकला, नाट्यकला, हस्तकौशल्य व खेळ याद्वारे त्यांच्याअंगी असलेल्या गुणांचा आविष्कार करण्याची संधी त्यांना मिळते, आणि यातूनच त्यांचा शारीरिक, मानसिक, बौध्दीक व सामाजिक विकास घडून येतो. सदृढ शरीर, अंगी जे चातुर्य, मनाचे औदार्य, आत्मिक बल या बरोबरीनेच जीवनात हरघडी अनुभव येणाऱ्या बऱ्या-वाईट प्रसंगांना तोंड देण्याचे नैतिक धैर्य खेळातून मिळते. प्रासंगिक आवाहन स्विकारण्याची उद्भवलेल्या समस्येवर मात करण्याची सवय खेळातून घडते. जीवनरूपी खेळात यश व अपयश कसे स्विकारायचे, पचवायचे याचे प्रात्यक्षिक खेळातून अनुभवास मिळते.'स्काऊट-गाईड' मध्ये अनेक खेळ खेळले जातात. व स्काउटर-गाईडर यांच्या कल्पकतेनूसार या संख्येत नेहमी नव-नविन बाबींची भर पडत असते. सामान्यत: या खेळांची पुढील गटात विभागणी करता येते.

अ) परिचयात्मक व करमणूकीचे खेळ- शिबिर, मेळावे, समारंभ प्रसंगी प्रेक्षक एकत्र जमतात. त्यांच्यात परस्पर ओळखी असतात, ते एकमेकांशी गप्पा करण्यात मग्न होतात. परंतु इतर मंडळीमात्र कंटाळतात व चुळबुळ सुरू होते. अशावेळी त्यांना छोटेमोठे खेळ, विनोद, चुटके सांगने, कोडे सांगने, कुतूहल प्रश्न विचारणे वगैरे पध्दतीने त्यांना गुंतविले तर वेळ जातो आणि मनावरील दडपण कमी होते. परस्परमध्ये ओळख होऊन मित्रत्व भावना वाढीस लागते, शिवाय वेगवेगळ्या संस्कृतीची ओळख होते.

उदा. तळ्यात मळ्यात, लपलेला पुढारी, मित्राचा शोध, शब्दाक्षर कुटूंब, गाणे ओळखा इत्यादी.

ब) किमचे खेळ - किमचे खेळ प्रामुख्याने डोळे, नाक, कान, त्वचा व जीभ या पंचेंद्रियांच्या क्षमता वाढविण्याच्या दृष्टीने आखले आहेत. प्रसिध्द कादंबरीकार व नोबेल पुरस्कार विजेते रुडयार्ड किप्लींग यांनी किमचे खेळ प्रथम उजेडात आणले. किम (मुळ नांव किम्बॉल ओ-हारा) हा हिंदुस्थानात वाढलेला एक आयरीस कुटूंबातील मुलगा. त्यांना हिंदी लोकांच्या चालरिती, भाषा व इतर बाबी

E- ISSN 2582-5429
AMRJ
Akshara Multidisciplinary Research Journal
Peer-Reviewed & Refereed International Research Journal
January-March 2022 Volume 3 Issue III
SJIF Impact- 5.54

चांगल्या प्रकारे अवगत होत्या. तो हिंदुस्थानातच हेरगीरीच्या कामावर होता. तो उत्कृष्ट निरिक्षक होता. तो आपला फावला वेळ आपल्या ज्ञानेंद्रीयांच्या क्षमता वाढविण्यात घालवित असे. बुध्दीला चालना देणारे बरेच खेळ त्याने उपयोगात आणले. स्काऊट-गाईड ला चांगले निरिक्षक बनविण्याचे शिक्षण आवश्यक असते. त्यासाठी त्यांना आपले डोळे, कान सदासर्वदा उघडे व जागरूक ठेवावे लागतात, निरिक्षणाने तत्परता अंगी बाणविली जाते व सर्व प्रकारच्या संकटांना तोंड देण्याची क्षमता वाढते. ज्ञानेंद्रियांच्या क्षमता विकसनाचे खेळ खेळतांना मौज वाटते व भरपूर करमणूकही होते. या खेळाद्वारे ज्ञान ग्रहण करण्याची शक्ती वाढते.

उदा. वासावरून पदार्थ ओळखणे, आवाजावरून वस्तू ओळखणे, चवीवरून पदार्थ ओळखणे, स्पर्शाने वस्तू ओळखणे इत्यादी.

(क) वाईल्ड गेम (जंगलातील खेळ)- हे खेळ जंगलात, माळरानावर किंवा विस्तिर्ण मोकळ्या मैदानात खेळले जातात. ह्या खेळांना मोठा परिसर आणि वेळही लागतो. जंगलात आणि डोंगराळ भागात हे खेळ खेळतांना आनंद वाटतो, शौर्य आणि धाडस या गुणांचा विकास होतो. या खेळात काल्पनिक डावपेचांचे आयोजन करणे व त्यानुसार कृती करण्याची संधी मिळत असल्यामूळे खेळाडूमध्ये स्वयंकर्तृत्व, कल्पकता व नेतृत्वगुण विकसित होतात. या खेळात खेळाडू निसर्गाच्या सानिध्यात येतो व निसर्गाशी जवळीक निर्माण झाल्याचा सुखद अनुभव उपभोगतो. या खेळाच्या वेळी पथक प्रमुख यांनी खेळाडू ( स्काऊटस् किंवा गाईडस् ) वर जबाबदारीपूर्वक लक्ष ठेवणे जरूरीचे असते. उदा. जलद शिकार, विचित्र मानवाचा शोध, बोलकी बाटली, ध्वज दरोडा इत्यादी.

(ड) रात्रीचे खेळ (नाईट गेम)- नाईट गेम्स हे उत्कृष्ट प्रकारचे शैक्षणिक साधन असून ते सूर्यास्तानंतर खेळले जातात, ज्या मुलांना अंधाराची भिती वाटते, अशा मुलांची भिती नाहिशी करण्यासाठी या खेळाचा उपयोग होतो. टॉर्च घेऊन अंधारात रात्रीचे खेळ खेळण्याचा आनंद काही वेगळाच असतो. उदा. किल्ला काबीज करणे, वर्तुळात जागा मिळवा, आवाजाचा पाठलाग, डोळे झाकणे, गाठी बांधणे इत्यादी.

(इ) विस्तिर्ण मैदानी खेळ (वाईड गेम्स)- विस्तृत मैदानी व खूप वेळ खेळल्या जाणाऱ्या खेळांना 'विस्तिर्ण खेळ' म्हणतात. हे खेळ जंगल, डोंगर व विस्तिर्ण मोकळ्या मैदानावर खेळले जातात. उदा. क्रिकेट, हॉकी, फुटबॉल, विट्टी-दांडू लपाछपी, चोर शिपाई, किल्ला सर करणे, साखळी गेम इत्यादी.

(फ) शेकोटी जवळचे खेळ- शिबिरे, मेळावे यात संपूर्ण दिवसभर भरपूर काम केल्यानंतर रात्री श्रमपरिहार व्हावा यासाठी शेकोटी करून त्याभोवती जमून करमणूक केली जाते. करमणूक हाच प्रदान हेतू असल्याने यावेळी केलेले खेळ, कार्यक्रम गंमतीदार आणि प्रेक्षकांची मने रिझविणारे असतात. या खेळात स्पर्धा नसते, शिवाय असे खेळ खेळण्यात शारीरिक शक्ती अगर श्रम पडत नसल्यामूळे लहान मोठ्यांना सहभागी होता येते. या खेळात वेळेचे भान राखणे महत्वाचे असते. उदा. हात वाऱ्याची भाषा, हास्य फूलवा, गंभीर व्हा, पाठीने फुगा फोडणे, डोळे बांधून फुगा फोडणे, हसवा व विजय मिळवा इत्यादी.

३.) बी.पी.सिक्स- आपले आरोग्य चांगले राहावे म्हणून प्रत्येकास स्वच्छ व पौष्टीक आहार, शुध्द हवा, गाढ झोप आणि नियमित व्यायाम याची आवश्यकता असते. प्रत्येकाने आपल्या शारीरिक क्षमतेनूसार नियमितपणे व्यायाम घ्यावा. व्यायामामुळे हात, पाय, पोट, धड, शीर इत्यादी शरिराच्या भागाच्या हालचाली होतात व शरीर मजबूत बनते. श्वासोच्छवास व रक्ताभिसरण क्रिया नियमित राहतात. शारीरिक व मानसिक उत्साह वाढतो. व्यायामानंतर हलकासा आहार घ्यायचा असतो.

लॉर्ड बेडन पॉवेल यांनी उत्तम आरोग्यासाठी केवळ ' सहा आरोग्यदायक व्यायाम प्रकार निर्धारित केलेले आहेत, त्याला ' बी.पी. सिक्स ' म्हणतात ते पुढीलप्रमाणे आहेत

१) डोके व मान याकरिता व्यायाम
२) छातीचा व्यायाम.
३) पोटाचा व्यायाम,
४) धडाकरिता व्यायाम.
५) कमेरखालच्या भाग व पोटऱ्याकरिता व्यायाम.
६) पाय, पावले व पायांची बोटे यांचेकरिता व्यायाम.

४) प्रथमोपचार- 'इतरांच्या उपयोगी पडणे' हा स्काऊट-गाईड मधील एक भाग आहे. या धका धकीच्या, धाईगर्दीच्या व यंत्राच्या युगात प्रयत्नपूर्वक अपघात टाळावे लागतात. तरीपण लहान-सहान अपघात होतातच. या दृष्टीने प्रत्येक स्काऊट-गाईडला प्रथमोपचाराचे जुजबी ज्ञान अवगत करून देतात. प्रथमोपचारामूळे अपघाताची तिव्रता कमी होते. अपघाताचे वेळी गोंधळून न जाता मन शांत ठेऊन त्वरीत व जागच्या जागी डॉक्टर येण्यापूर्वी काही तात्कालीन उपचार करतात. प्रथमोपचाराचे ज्ञान असल्याने - स्काऊट-गाईड प्रसंगानुरूप वागतात. डॉक्टराची जबाबदारी स्वत:वर घेत नाही. कारण काही वेळा डॉक्टरला • बोलावून आणा

E- ISSN 2582-5429
Akshara Multidisciplinary Research Journal
Peer-Reviewed & Refereed International Research Journal
January-March 2022 Volume 3 Issue III SJIF Impact- 5.54

किंवा दुखापत झालेल्या व्यक्तिस दवाखाण्यात घेवून जाणे आवश्यक असते. स्काऊट गाईड पथकाकडे सहज वाहून नेता येईल, अशी प्रथमोपचार पेटी असते. किरकोळ जखमावर मलमपट्टी करणे, लचकणे, नाकातून रक्त येणे, चक्कर येणे यासारख्या समस्यावर स्काऊट-गाईड प्रथमोपचार करतात. तसेच जखमेवर पट्टी बांधणे, झोळी तयार करणे, बँडेज तयार करणे, तात्पुरते स्ट्रेचर तयार करणे, प्राणरक्षक दोर फेकणे, मज्जाघात (शॉक), उष्माघात, विषबाधा, गुदमरणे, घशात अडकणे, विषारी वायुबाधा, हाड मोडणे वगैरे बाबी अभ्यासक्रमातच असल्याने त्यांना प्रथमोपचाराचे प्रात्यक्षिकयुक्त ज्ञान असते.

**५) हस्तव्यवसाय व कौशल्य-** सर्वसामान्य मुलांना आपली कामे आवडीने करावी असे वाटते. परंतु त्यांना योग्य मार्गदर्शन न मिळाल्याने ते प्रवाहपतीत होतात व त्यांची आयुष्यात दुर्दशा होते. याचा परिणाम फक्त त्याच्या जीवनावरच होतो, असे नव्हे तर इतरांच्या जीवनावर, समाजावर आणि राष्ट्रावरही होतो. कधी कधी तर अशा दिशाहीन मुलांपासून समाजाला आणि पर्यायाने देशाला धोकाही निर्माण होऊ शकतो.ही परिस्थिती सुधारण्यासाठी ' स्काऊट-गाईड' मधून हस्तव्यवसाय व हस्तकौशल्यांचे शिक्षण दिले जाते. यातूनच गरिब मुलांना हस्तव्यवसायासाठी दिशा मिळते व चरितार्थाचे साधन निर्माण करणे शक्य असते. सुरूवातीला अगदी साधे-साधे हस्तव्यवसाय आहेत. त्यामुळे मुलांमध्ये आत्मविश्वास वाढीस लागतो व कौशल्य विकसित होत जातात. त्यांना ही कामे करण्यात आनंद वाटतो.

**६) शेकोटी कार्यक्रम-** स्काऊट-गाईड मेळावा जशी अविस्मरणिय बाब असते, तसेच मेळाव्यातील शेकोटी कार्यक्रम हा देखील दिर्घकाळ लक्षात राहणारा प्रसंग असतो. शेकोटी कार्यक्रम हा चांगल्या प्रकारे मनोरंजन करणारा, सांस्कृतिक व शैक्षणिक कार्यक्रम असतो. दिवसभराचा थकवा घालविण्यासाठी याचा फार उपयोग होतो. यामधून स्फूर्ती, निकोप दृष्टीकोन, भरपूर सात्विक करमणूक व आत्मविष्काराची चांगली संधी याचा लाभ होतो. यामध्ये स्काऊट-गाईडचे नियम, चांगली नितितत्वे व शिस्त यावर आधारित असे आनंदी, खेळकर व निखळ मनोरंजनात्मक शैक्षणिक कार्यक्रम असतात. व्यक्ती, धर्म, जात, स्त्रीया, समाज यांची थट्टा उडविणारे कार्यक्रम इत्यादी सादर होणार नाहीत, याची दक्षता घेतली जाते. नकारात्मक संदेश देणारे कार्यक्रम टाळले जातात. शेकोटी कार्यक्रमात केवळ गाणी व नृत्य हेच कार्यक्रम असतात, असे नव्हे तर कार्यक्रमात विविधता, कल्पकता व नाविन्यता असते.

**७) सेवाकार्यासाठी उपक्रम-** स्काऊट-गाईडचे संघ किंवा पथक समाजसेवार्थ असे अनेक उपक्रम अभ्यासक्रमाचा एक भाग म्हणून राबवित असते. यामध्ये छंदवर्ग चालविणे, कुष्ठरोग निर्मूलन, कृषी सेवा, अल्पबचत, श्रमदान, प्रौढ शिक्षण, अनौपचारिक शिक्षण, समुहाचे सत्कृत्य, परिसर स्वच्छता, गाजर गवत निर्मूलन, सार्वजनिक स्थळांची माहिती मिळविणे, वृक्षारोपन व वृक्ष संगोपन, पॉलिथीन निर्मूलन, गुटखा बंदी, हुंडाबळी, व्यसनमुक्ती, अस्पृश्यता निवारण, अंधश्रध्दा निमुर्लन, शालेय परिसर स्वच्छता यासारखे समवोपयोगी उपक्रम राबविण्यात येत असतात.

परिसरातील स्वयंसेवी संस्था किंवा शासकिय यंत्रणेने आयोजित केलेल्या शिबिरामध्ये सेवा करण्याची चांगली संधी उपलब्ध होत असते. पूरग्रस्त सेवा शिबिर, रक्तदान शिबिर, नेत्रदान शिबिर, पोलिओ निर्मूलन मोहीम, नेत्र चिकित्सा शिबिर, श्रमदान सेवा शिबिर, राष्ट्रीय एकात्मता सेवा शिबिर, साक्षरता प्रसार मोहीम,स्वच्छता मोहीम, वाहतूक सुरक्षा शिबिर, पुनर्बल संजीवनी (ओ.आर.टी.), एड्स् जनजागृती शिबिर अशा अनेक शिबिरांमधून स्काऊटस् व गाईडस् आपले संघनायकाच्या नेतृत्वात काम करतात. आपले देशात अनेक सण, उत्सव व समारंभ साजरे होत असतात. यामध्येदेखील प्रत्यक्ष सहभागी होऊन समाजसेवा करीत असतात. उदा. गणेश उत्सव, शारदाउत्सव, कृष्ण अष्टमी, रामलिला, ग्राम यात्रा, विज्ञान प्रदर्शनी, स्नेहसंम्मेलन, दुर्गा उत्सव, ख्रिसमस, ईद, कवी संम्मेलन, क्रिडा स्पर्धा, साहित्य संम्मेलन इत्यादी प्रकारच्या कार्यक्रमांच्यावेळी सेवा शिबिरात सहभागी होता येते.

**स्काऊट गाईड विषयाचे महत्व**

आपल्या जीवनात अशी काही मूल्ये आहेत की, जी आचरणात आणल्यामुळे त्याचा प्रभाव फक्त स्वतःचे जीवनमान उंचावण्याकरीता होत असतो, नव्हे तर संपूर्ण समाजच उर्ध्वातावस्थेत नेण्याचे सामर्थ्य यामध्ये सामावलेले असते. सेवा आणि त्याग हे आपले राष्ट्रीय आदर्श आहेत की, ज्यामुळे आपन समाजात चारित्र्यवान व सुसंस्कारी नागरिक निर्माण करू शकतो आणि चारित्र्य निर्मिती हे तर स्काऊट शिक्षणाचे ध्येयच आहे. जर शिक्षण चारित्र्यवान नागरिकांची निर्मिती करू शकत नसेल, तर ते शिक्षण कुचकामाचे ठरेल. शस्त्रांच्या बळापेक्षा नागरिकांमध्ये आलेल्या शीलाच्या बळावरच राष्ट्राचे भवितव्य अवलंबून असते. आयुष्यामध्ये यशस्वी होण्यासाठी पांडित्यापेक्षा शीलाची अधिक आवश्यकता असते. म्हणून व्यक्तीच्या काय ? किंवा राष्ट्राच्या काय? पहिल्या क्रमांकाची मौल्यवान गोष्ट कोणती असेल, तर ती म्हणजे शील आहे.

संपूर्ण जगाच्या इतिहासात आपणाला असे दिसेल की, आपल्या पूर्वजांनी शिक्षणाला अग्रक्रम दिला आहे. आज मात्र

आजची शाळा, महाविद्यालये पुस्तकातील मजकुर विद्यार्थ्यांच्या मेंदूत कोंबण्याचे कारखाने झाले आहेत. यामुळे आजच्या विद्यार्थ्यांना वर्गाच्या चार भिंतीबाहेरील जगाचा संपूर्ण विसर पडला असल्याचे दिसून येत आहे. त्यांचे योग्य निरीक्षण अत्यंत कमकुवत व संकुचित झाले आहे. या उलट टेलीव्हीजन प्रसारणातून अनैतिकतेचे दर्शन त्याला घडते आहे. कोणतेही वर्तमान पत्र उघडले की अनैतिक बातम्यांचा सुळसुळाट दिसून येतो. आजचा युवक आपल्या उघड्या डोळ्यांनी समोरील पालक, शिक्षक, नव्हे बहुतांश समाजच अनैतिक व्यवहारात गुरफटलेला पाहतो आहे. परंतु त्याला मात्र पुस्तकातून, लेखनातून व भाषण बाजीतून नितीमत्तेचे डोस पाजले जात आहे. अशा परस्पर विरोधी वातावरणात तो पूर्णतः गुदमरून जात असल्याचे दिसते आहे. कोणते योग्य आणि कोणते अयोग्य या द्विधा मन:स्थितीत तो वावरतो आहे. स्वामी विवेकानंदाच्या मते, चारित्र्य घडविणारे, मानसिक बल वाढविणारे, बुध्दीला विशाल करणारे आणि स्वावलंबी बनविणारे असे शिक्षण असावयास हवे. आपल्या देशातील प्राचीन ऋषिमुनींपासून तर आधुनिक विचारवंत व शिक्षण तज्ञांपर्यंत सर्वांनीच मूल्य शिक्षणाचे महत्व प्रतिपादन केले आहे. भावी जीवनाची पूर्व तयारी करण्यासाठी विद्यार्थ्यांना अशा मौल्यवान शिक्षणाची गरज आहे. शालेय विद्यार्थ्यांच्या मनावर प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांमधून स्काऊट-गाईड विषयातील उपक्रमांद्वारे उत्तम संस्कार सातत्याने करण्यात येत असतात. स्काऊट गाईड विषयाच्या या उपयुक्ततेचा विचार करून महाराष्ट्र शासनाने 'मूल्य शिक्षण स्काऊट-गाईड द्वारा' देण्याचे माध्यमिक स्तराकरिता मान्य केले आहे.

निरोगी, उत्साही व सशक्त मुला-मुलींना निसर्ग सहवासाची व उघड्यावरच्या मुक्त जीवनाची आवड आणि हौस असते. त्यांच्या या आवडीचा, छंदाचा व उत्साहपूर्वक कृती करण्याच्या वृत्तीचा स्काऊट-गाईडमध्ये कौशल्यपूर्ण रितीने उपयोग करून घेतला जातो. 'संघ पध्दती' ने शिक्षण होत असल्यामुळे प्रत्येक विद्यार्थ्यांवरच जबाबदारी असते. यामुळे एकत्रितपणे काम करण्याची, इतरांचे विचार जाणून आपले मत प्रगट करण्याची संधी प्रत्येकास मिळते. ही सर्व मुले अथवा मुली एकत्रितपणे काम करतात, कार्यक्रम करतात, परस्परांच्या सुख-दुःखात सहभागी होतात, उद्भवलेल्या अडीअडचणींवर सामुदायिकपणे तोडगा काढतात. महत्वाचे असे की मुलांनाच मुळी गटा गटात राहायला व एकत्रितपणे काम करायला आवडते. प्रत्येकाने दररोज एकतरी सत्कृत्य ( दुसऱ्याच्या उपयोगी पडण्याचे काम) करावे, यावर स्काऊट-गाईड शिक्षणाचा कटाक्ष असतो, नव्हे तर तो रोजच्या आचरणाचा भाग मानल्या जातो. स्काऊट-गाईडच्या वचन व नियमामध्येदेखील आवश्यक ती नितीमूल्य ग्रंथीत केल्याचे दिसून येते. अशाप्रकारे निष्ठावान नागरिक बनण्याचे धडे स्काऊट-गाईड स्वत:च स्वयंस्फूर्तीने घेत असतात. स्वावलंबन आणि स्वयंशिक्षण हे स्काऊट गाईड या विषयाचे एक अंग मानले जाते. स्काऊट-गाईड अभ्यासक्रमातून मोकळ्या मैदानावरील खेळ, स्पर्धा, कार्यक्रम, निसर्गनिवास, रानावनातील खेळ व साहस कार्य, चढाओढी इत्यादींच्या माध्यमातून विविधांगी शिक्षण मुला-मुलींना मिळावे, अशी अपेक्षा आहे. आगळ्या-वेगळ्या व वैशिष्टयपूर्ण संघ पध्दती (Patrol System) मुळे नेतृत्वगुण विकासाला प्रत्यक्षपणे संधी उपलब्ध होते. संघ आणि पथकाचे निर्णय लोकशाही पध्दतीने घेतले जातात. म्हणून याद्वारे प्रत्यक्ष अनुभवातून लोकशाहीच्या दृष्टीने तयारी करण्यासाठी आवश्यक गुण स्काऊट-गाईडचे अंगी विकसित होण्यास मदत होते व या शिक्षणाचा चांगला उपयोग होता. या शिक्षणाच्या प्रात्यक्षिक तथा कृतिपर अध्ययनातून शिस्तप्रियता, श्रमनिष्ठा, स्वच्छता, कर्तव्य दक्षता, स्वावलंबन, विज्ञाननिष्ठा, सुचिता, भूतदया, निर्भयता, खेळाडू वृत्ती इत्यादी वैयक्तीक मूल्यांची आणि सेवा, समता, बंधूता, सर्वधर्मसहिष्णूता, न्यायप्रियता, सौजन्यशिलता, आदरभाव, सत्यप्रियता, अहिंसा, मानवता, निसर्गप्रेम, परस्पर सहकार्य इत्यादी सामाजिक मूल्यांची तसेच राष्ट्रभक्ती, राष्ट्रीय एकात्मता, विश्वबंधूता अशा राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय मूल्यांची अनुभूती येत जाते आणि विकास घडून येतो. राष्ट्रीय महामेळाव्यांच्या माध्यमातून विविध पंथ, जातीधर्म व राज्या-राज्यातुन एकत्र आलेल्या मुला-मुलींमध्ये बंधुभाव निर्माण होतो व आपलेपणाची भावना वाढीस लागते. आंतरराष्ट्रीय महामेळाव्यांमध्ये जगाच्या विविध देशातील स्काऊट गाईड मैत्री, विश्वबंधूता व मानवतेच्या नात्याने एकत्र येतात. सत्कृत्यामूळे (Good Turn) समाज सेवेचे धडे मिळतात, तर खरी कमाईचे माध्यमातून श्रमप्रतिष्ठा अंगी भिनते स्काऊट-गाईड विषयामध्ये विविध उपक्रम, कार्यक्रमामधून विद्यार्थ्यांचा बौध्दिक विकास तर होतोच, तसेच त्याचबरोबर सामाजिक, सांस्कृतिक व भावनात्मक विकासही आपोआपच होत असतो.

**समारोप** - मानवी जीवनात माणसाचे माणुसपण टिकवून ठेवण्यासाठी मूल्यच सहाय्यभूत ठरू शकतात आणि या मूल्यांचा विकास करण्यासाठी कुटुंबासोबतच शाळेलाही महत्वाची भूमिका बजावणे क्रमप्राप्त आहे, कारण आजच्या कुटुंब-ऱ्हासाच्या वा केंद्रीत कुटुंब असण्याच्या काळात शाळेला मुलांमध्ये जीवनमूल्ये विकसीत करण्याचे काम आपल्या खांद्यावर घ्यावे लागणार आहे. अध्ययन अध्यापन या सिमीत भूमिकेतून बाहेर पडून खऱ्या अर्थाने बालकाच्या सर्वांगिण विकास करण्याची भूमिका पार पाडावी लागेल. आणि ही भूमिका पार पाडण्यात स्काऊट गाईड विषयाची शाळेला मोठी मदत मिळू शकते. जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी हा विषय घेतला

E- ISSN 2582-5429

AMRJ Akshara Multidisciplinary Research Journal

Peer-Reviewed & Refereed International Research Journal

January-March 2022 Volume 3 Issue III SJIF Impact- 5.54

तरच यातून मूल्यविकसनाचे उद्दिष्ट साध्य होऊ शकेल. या विषयाची उपयुक्तता महत्वाची आहे.

**संदर्भग्रंथ सूची**


१) तृतीय सोपान स्काऊट-गाईड अभ्यासक्रम म.रा. भारत स्काऊटस् आणि गाईडस् राज्यसंस्था, मुंबई पृष्ठ क्रमांक ४

२) संघ पध्दती, म. रा. भारत स्काऊटस् आणि गाईडस् राज्यसंस्था, मुंबई पु. क्र. १

३) अहवाल पुस्तिका २००० म. रा. भारत स्काऊटस् आणि गाईडस् राज्यसंस्था, मुंबई पृ. क्र. ६

४) युगपुरुष लॉर्ड बेडन पॉवेल, एम.ई. कॉर्टर - प्रकाशक म. रा. भारत स्काऊटस् आणि गाईडस् राज्यसंस्था, मुंबई पृ.क्र. ३८५

५) अनुवादक श्री ह.सु. पाटील

६) शासन निर्णय महाराष्ट्र शासन शालेय शिक्षण विभाग दिनांक २९ मे १९९७, दिनांक ३ जून १९९७ व दिनांक १७ जून १९९९

७) स्काऊट चळवळीची मुलतत्वे पृ. क्र. ११

८) प्रकाशक म. रा. भारत स्काऊटस् आणि गाईडस् राज्यसंस्था, मुंबई


□ □ □

IQAC Co-ordinator
Chhatrapati Raje Sambhaji
College of Education,
Jalgaon

PRINCIPAL
Chhatrapati Raje Sambhaji
College of Education
Jalgaon

| Sr. No. | Name of the Author | Title of Paper | Page No. |
|---|---|---|---|
| 61. | डॉ. मधुकर जडल<br>धनराज पाटील | आजच्या उच्च शिक्षणापुढील आव्हाने | 218 |
| 62. | श्री रुपेश भागुराम तांबे<br>डॉ. एम. व्ही मते | रायगड जिल्हा परिषद प्राथमिक शाळा खरकवाडीच्या गुणवत्ता विकासात लोकसहभागाचे योगदान | 220 |
| 63. | श्री. सुजित आप्पासाहेब लोखंडे | स्वातंत्र्योत्तर कालखंडातील महाराष्ट्रातील स्त्री शिक्षणाची वाटचाल : एक ऐतिहासिक अभ्यास | 223 |
| 64. | प्रा. राहुल विष्णू मते<br>डॉ. सुग्रीव श्रीमंत गोरे | उच्च शिक्षणातील 'उच्च' संधी—काळाची गरज | 227 |
| 65. | प्रा. डॉ. बाळकृष्ण भावे<br>डॉ. [illegible] मधुकर [illegible] | कोरोना महामारीनंतर माध्यमिक शिक्षणातील आव्हाने दशा व दिशा — एक अभ्यास | 230 |
| 66. | सौ. प्रतिभा विश्वनाथ पांचाळ<br>डॉ. ए. एच. कदम | मानवी हक्क व कायदयाविषयी महिलांची शिक्षणातून जागरुकता: महिला सुरक्षिततेचा एक मार्ग | 234 |
| 67. | श्रीमती. अंजान नारायण खरात | हिंदी और मराठी कविता में किसान विमर्श का तुलनात्मक अध्ययन | 239 |
| 68. | श्रीम.माधुरी भारत पगारे<br>प्रा.डॉ.शैलेजा डोंगर भंगाळे | मराठी माध्यम आणि इंग्रजी माध्यमातील माध्यमिक शिक्षकांच्या अध्यापन अभियोग्यतेचा तुलनात्मक अभ्यास | 241 |
| 69. | प्रा. माधुरी देवीदास पाटील | उच्चशिक्षणात नावीन्यपूर्ण तंत्रज्ञानाचा वापर | 246 |
| 70. | वनिता गायकवाड | भारतातील उच्च शिक्षणातील समस्यावरील उपाय | 253 |
| 71. | श्रीम. शुभांगी शिवाजी रितपुरे.<br>प्रा. डॉ. रविराज अच्युत फुरडे | सोलापूर महानगरपालिकेच्या प्राथमिक शाळेत राबविलेल्या मूल्यवर्धन कार्यक्रमाच्या सद्यस्थितीचा अभ्यास | 255 |
| 72. | श्री दिक्षित आण्णा बाबू<br>डॉ. डिसले महादेव सदाशिव | माध्यमिक स्तरावरील गणित विषयासाठी ज्ञानरचनावादी कृतियुक्त अध्ययन-अध्यापन कार्यनितीच्या परिणामकारकतेचा अभ्यास | 258 |
| 73. | [illegible] सिदाम<br>डॉ. [illegible] लक्ष्मण तांबे | उमरगा शहरातील श्रमजीवी शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील स्त्रीयांना विवाहानंतर शिक्षण घेताना येणा-या अडचणींचा चिकित्सक अभ्यास | 263 |

४ हस्त चलित (हँडहेल्ड) कंप्युटिंग डिवायमेस,



हँडहेल्ड संगणक हा एक संगणक आहे जो सोयीस्करपणे खिशात (पुरेशा आकाराचा) संग्रहित केला जाऊ शकतो आणि तुम्ही तो धरत असताना वापरला जाऊ शकतो. आजचे हँडहेल्ड कॉम्प्युटर, ज्यांना पर्सनल डिजिटल असिस्टंट (PDAs) देखील म्हटले जाते, आज, हस्तलिखित इनपुट स्वीकारणारे सर्वात लोकप्रिय हँडहेल्ड म्हणजे 3Com मधील PalmPilot. Philips, Casio, NEC, Compaq,ई.
Hewlett-Packard ने अलीकडेच रंगीत डिस्प्ले असलेला पहिला हँडहेल्ड संगणक सादर केला आहे.

शिक्षणात हस्त चलित (हँडहेल्ड) कंप्युटिंग डिवायमेसचा उपयोग

१. या उपकरणांचा वापर मूलभूत वाचन आणि लेखन कौशल्ये सुधारण्यासाठी केला जाऊ शकतो, जसे की विद्यार्थी स्वतःचे वाचन रेकॉर्ड करतात. शिक्षक आणि/किंवा विद्यार्थी त्यांचे रेकॉर्डिंग iPod द्वारे ऐकू शकतात.
२. स्मार्टफोन, टॅबलेट किंवा लॅपटॉप सारख्या काही हातातील उपकरणांमध्ये सामग्री आणि गेम डाउनलोड करण्याची क्षमता असते.
३. हँडहेल्ड संगणक सामान्यतः वैयक्तिक माहिती व्यवस्थापक (PIM) प्रकारच्या अनुप्रयोगांसाठी वापरले जातात.
४. वेळापत्रक राखणे, नावे आणि फोन नंबर ठेवणे, साधी गणना करणे, नोट्स घेणे आणि मोडेमसह, ई-मेलची देवाणघेवाण करणे आणि ऑनलाइन माहिती मिळवणे यासाठी वापरले जातात.
५.विद्यार्थ्यांच्या विकासासाठी अॅडॅप्टीव कंप्यूटर टेस्टिंग -



विद्यार्थ्यांसाठी, संगणक-अनुकूल चाचणी हे कमी प्रश्नांसह एक लहान चाचणी सत्र देते, कारण विद्यार्थ्यांसाठी योग्य समजले जाणारे प्रश्नच दिले जातात. दुसरीकडे, चाचणी विकसकांना चाचणी आयटमचा एक मोठा पूल तयार करावा लागेल जेणेकरून परीक्षा देणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांच्या विविध क्षमतांशी जुळण्यासाठी चाचणी प्रणालीमध्ये पुरेसे प्रश्न असतील. संगणक-अनुकूल चाचणीचे सर्वात वर्तमान प्रकार सामान्यतः ऑनलाइन प्रशासित केले जातात, आणि गुणांकन संगणकीकृत असल्यामुळे, शिक्षक आणि विद्यार्थी पेपर-आणि-पेन्सिल चाचण्यांपेक्षा अधिक लवकर चाचणी निकाल मिळवू शकतात.

**शिक्षकांसाठी उपयोगी**

संगणक-अनुकूल चाचण्या मोठ्या प्रमाणात, उच्च स्टेक चाचणीसह विविध उद्देशांसाठी वापरल्या जाऊ शकतात; फॉर्मेटिव्ह असेसमेंट, जे शिक्षकांना विद्यार्थ्यांच्या शिकण्यावर प्रक्रियेतील फीडबॅक प्रदान करते ज्याचा वापर ते शिक्षण तंत्रात बदल करण्यासाठी करू शकतात; आणि सारांशात्मक मूल्यमापन, ज्याचा उपयोग शिक्षक युनिट, टर्म किंवा वर्षाच्या शेवटी विद्यार्थी काय शिकले हे निर्धारित करण्यासाठी करतात. ज्यांना विशिष्ट कौशल्य किंवा विषय क्षेत्रात, जसे की वाचन, लेखन किंवा गणितामध्ये विशेष शैक्षणिक समर्थनाची आवश्यकता असू शकते अशा विद्यार्थ्यांना ओळखण्यासाठी देखील त्यांचा वापर केला जातो.

**विद्यार्थ्यांसाठी उपयोगी**

संगणक-अनुकूल चाचणी प्रणाली प्रत्येक विद्यार्थ्यासाठी योग्य आव्हानात्मक ठरणारे प्रश्न निवडत असल्याने, बहुतेक विद्यार्थ्यांना सुमारे अर्धे प्रश्न बरोबर आणि अर्धे चुकीचे मिळतील, त्यामुळे एकूण संख्या किंवा योग्य प्रतिसादांच्या टक्केवारीवर आधारित गुण निरर्थक असतील. म्हणून, संगणक-अनुकूल स्कोअरिंग प्रदान केलेल्या अचूक उत्तरांची संख्या आणि पूर्ण केलेल्या आयटमची अडचण या दोन्हीवर आधारित आहे. विद्यार्थ्यांना चाचण्या देण्यापूर्वी, चाचणी प्रश्नांची सामान्यतः अडचणीची पातळी मोजण्यासाठी विद्यार्थ्यांच्या प्रातिनिधिक नमुन्यांसह फील्ड-चाचणी केली जाते.

**६.इतर स्वरूपातील सॉफ्टवेअर -**




सॉफ्टवेअर म्हणजे अनुदेशांचा संच होय, ज्याला आपण प्रोग्राम म्हणतो.

वर्डप्रोसेसर, स्प्रेडशीट, डेटाबेस मॅनेजमेंट सिस्टीम प्रेझेन्टेशन, ग्राफिक्स हे काही मूलभूत अॅप्लीकेशन सॉफ्टवेअर आहेत तर गेमिंग, ऑडिओ, व्हिडीओ, मल्टीमिडीया, रेंडरींग आणि आर्टिफिशल इन्टेलिजन्स, इमेज एडिटर्स, इत्यादी काही अॅप्लीकेशन सॉफ्टवेअर आहेत.

मांडला. त्यांचा म्हणण्यानुसार मशीन लर्निंग हे आर्टिफिशिअल इंटेलिजन्स चे अप्लिकेशन आहे. ज्यामध्ये आपण कॉम्पुटर मध्ये एक असा प्रोग्राम टाकू शकतो जो तेच काम करेल जे युजरला पाहिजे असेल.
दैनंदिन आयुष्यातील मशीन लर्निंग वापरात असलेली काही उदाहरणे

१. आभासी वैयक्तिक मदतनीस (Virtual Personal Assistants) -
अँड्रॉइड मोबाईल मधील गुगल असिस्टंट, आयफोन मधील सिरी, ऍमेझॉन इको, गुगल होम.

२. ऑनलाईन कस्टमर सपोर्ट-
यात तुम्ही रोबोट सदृश व्यक्तीशी संवाद साधता. तुम्ही दिलेल्या माहितीच्या आधारे रोबोट तुम्हाला मदत करतो.

३. फेसबुक
फेसबुक तुमच्या वैयक्तिक माहितीचा वापर करून तुम्हाला मित्र शोधण्यात मदत करतो. तसेच तुमच्या आवडी निवडी नुसार तुम्हाला नवीन पेजेस आणि व्हिडिओची शिफारस करतो.

४. गुगल मॅप्स
गुगल मॅप्स तुम्हाला ट्रॅफिक अपडेट्स देते तसेच पर्यायी मार्ग दाखवतात.

५. जीमेल
जीमेल नको असलेलं ई-मेल जसे कि स्पॅम मेल स्वतः डिलीट करते.

**शिक्षणात मशीन लर्निंग चा उपयोग**

१. हे प्रोग्राम जटिल क्रिप्टोग्राफिक अल्गोरिदम, प्रचंड मोठी गणितो समीकरणे सोडविण्यासाठी बनविलेले आहेत.
२. तसेच हे तंत्रज्ञान मोठ्या प्रमाणात अंतराळ मोहिमेमध्ये वापरले जाते.
३. यात खूप साऱ्या अल्गोरिथमला (Algorithm) एकत्र जोडले जाते ज्यामुळे कम्प्युटर उत्तम निष्कर्ष काढू शकेल.
४. मशीन लर्निंग प्रोग्राम हे पूर्वानुमान लावू शकतो म्हणजेच एखादी क्रिया घडण्याआधीच निष्कर्ष काढू शकतो.

**३.ब्लॉक चेन**




ब्लॉकचेन ही एक अशी प्रणाली आहे ज्यामध्ये पीअर-टू-पीअर नेटवर्कमध्ये जोडलेल्या अनेक संगणकांवर व्यवहारांची नोंद ठेवली जाते.

ब्लॉकचेन ही डेटाच्या अपरिवर्तनीय रेकॉर्डची टाइम-स्टॅम्प केलेली मालिका आहे जी संगणकांचे क्लस्टर व्यवस्थापित केली जाते. हे संगणक जगभरात आहेत आणि ते एका घटकाच्या मालकीचे नाहीत.

डेटाचा प्रत्येक ब्लॉक क्रिप्टोग्राफिक तत्वे (साखळी) वापरून सुरक्षित आणि एकमेकांशी बांधला जातो.

Blockchain चा शोध सातोशी नाकामोटो ने 2008 मध्ये लावला होता. पण एक मनोरंजक गोष्ट म्हणजेसातोशी नाकामोटो हे एका अज्ञात व्यक्तीचे किंवा लोकांच्या गटाचे नाव आहे ज्यांनी बिटकॉइन विकसित केले आणि बिटकॉइन व्हाईट पेपरचे लेखन केले, जे या तंत्रज्ञानाची सुरुवात आहेत.

ब्लॉकचेन तंत्रज्ञान देणगी, ऑनलाइन अभ्यासक्रम, होस्टिंग, पुनर्प्राप्ती, सॉफ्टवेअर, बँक, कॅसिनो, ऑनलाईन गॅम्बलिन, फायनान्स, रिअल इस्टेट, मनी ट्रान्सफर, विमा ,न्यायशास्त्र ,औषध. इ. क्षेत्रात वापरले जाते

**शिक्षणात ब्लॉकचेनचा उपयोग**

१.डिजिटल प्रमाणपत्रे, प्रतिलेख आणि विद्यार्थ्यांचे रेकॉर्ड:

रेकॉर्ड अपरिवर्तनीय असतील आणि ब्लॉकचेनमध्ये प्रवेश असलेल्या कोणत्याही व्यक्तीद्वारे त्यांचे प्रमाणीकरण आणि मूल्यमापन केले जाऊ शकते. रेकॉर्ड शेअर्ड डिस्ट्रिब्युटेड लेजरमध्ये साठवले जात असल्याने, प्रमाणपत्र जारी केलेली संस्था यापुढे अस्तित्वात नसली तरीही ते प्रमाणित केले जाऊ शकते.

२.पेपर बदला:

डिजिटल रेकॉर्ड, ट्रान्सक्रिप्ट, डिप्लोमा, प्रमाणपत्रे आणि इतर कोणत्याही कागदपत्रांच्या वापरासह, ब्लॉकचेन पेपरची जागा घेईल.रेकॉर्ड हरवण्याची किंवा सुरक्षित ठिकाणी ठेवण्याची काळजी करण्याची गरज नाही.

३.क्रेडेन्शियल्स:

सर्व अपरिवर्तनीय प्रमाणपत्रे आणि क्रेडेन्शियल ब्लॉकचेनमध्ये संग्रहित केले जातील आणि डिजिटल वॉलेटमधून कधीही पुनर्प्राप्त केले जाऊ शकतात.

४.रेकॉर्ड्सची प्रवेशयोग्यता:

शिक्षक, विद्यार्थी आणि कोणतीही व्यक्ती डिजिटल वॉलेटवरून क्रेडेन्शियल्स आणि रेकॉर्ड पाहू शकतात आणि त्यात प्रवेश करू शकतात.

५. ट्यूशन फी:

काही संस्था कोर्स फी भरण्यासाठी एक फॉर्म म्हणून क्रिप्टोकरन्सी स्वीकारण्यास सुरुवात करत आहेत. वॉलेटमध्ये क्रिप्टोकरन्सी असेल तर ते डिजिटल पैसे फी भरण्यासाठी वापरू शकतात.

६.माहितीचे प्रमाणीकरण:

बेकायदेशीर किंवा बनावट डिप्लोमा किंवा प्रमाणपत्रे असणार नाहीत. पदवी मिळविल्यावर तो डेटा बदलता न येणाऱ्या ब्लॉकचेनमध्ये मिळेल जो रिझ्युम किंवा लिंकडइन खात्यामध्ये भविष्यातील नियोक्त्यांसोबत शेअर करता येईल.

७. विद्यार्थ्यांसाठी प्रेरणा:

विद्यार्थ्यांना बक्षीस देण्याचा एक प्रकार टोकनसह असू शकतो. ते अभ्यासक्रमात जितके चांगले प्रदर्शन करतात तितके जास्त टोकन त्यांना मिळू शकतील. हे डिजिटल टोकन ब्लॉकचेन तंत्रज्ञानासह लागू केले जाऊ शकतात. विद्यार्थी अधिक अभ्यासक्रमांसाठी, ट्युशन फीसाठी वापरू शकतात.

८.विद्यार्थी आणि नियोक्ते यांच्यातील संबंध:

ब्लॉकचेनचा भाग असणाऱ्या या डिजिटल टोकन्सच्या वापरामुळे, अधिक टोकन असलेले विद्यार्थी लीडर बोर्डमध्ये असू शकतात. उमेदवार किती कुशल आहेत हे मोजण्याचा एक मार्ग म्हणजे विद्यार्थ्यांनी त्यांच्या अभ्यासक्रमादरम्यान किती टोकन प्राप्त केले.

९. पुरस्कृत उच्च दर्जाची सामग्री:

विद्यार्थ्यांना पुरस्कृत करण्यासाठी टोकन सिस्टमप्रमाणेच, या मॉडेलचा वापर शिक्षक, उपदेशक, डिझायनर आणि सामग्री निर्मात्यांना बक्षीस देण्यासाठी करू शकतो.

# उच्चशिक्षणात नावीन्यपूर्ण तंत्रज्ञानाचा वापर

**प्रा. माधुरी देवीदास पाटील**
सहाय्यक प्राध्यापक
श्री छत्रपती राजे संभाजी
शिक्षणशास्त्र
महाविद्यालय, जळगाव.

**सारांश**

*माहिती व संचार तंत्रज्ञान आणि इतर अत्याधुनिक क्षेत्रांमध्ये (उदा. अंतराळ) भारत जागतिक पातळीवर नेतृत्व करत आहे. डिजिटल भारत मोहिमेमुळे संपूर्ण राष्ट्रांचे एका डिजिटलदृष्ट्या सक्षम आणि ज्ञानावर आधारित अर्थव्यवस्थेमध्ये रूपांतर व्हायला मदत होत आहे. या रूपांतरामध्ये शिक्षण एक महत्त्वपूर्ण भूमिका बजावेल पण, शैक्षणिक प्रक्रिया आणि निष्पती यामध्ये सुधारणा करण्यामागे तंत्रज्ञानाचा मोठा हात असेल अशा प्रकारे, तंत्रज्ञान आणि शिक्षणामधील संबंध सर्व स्तरांवर दोन्ही बाजूंनी काम करतील.*

**महत्वाच्या संज्ञा** -
नाविन्यपूर्ण तंत्रज्ञान,आर्टिफिशियल इंटेलिजन्स,मशीन लर्निंग, ब्लॉक चेन,हस्त चलित (हँडहेल्ड) कंप्युटिंग डिवायसेस, विद्यार्थ्यांच्या विकासासाठी अडॅप्टीव कंप्युटर टेस्टिंग,इतर स्वरुपातील सॉफ्टवेअर.

**प्रस्तावना**

तांत्रिक विकासाच्या तीव्र वेगाला, तंत्रज्ञानाचे जाणकार शिक्षक आणि उद्योजकांसहित विद्यार्थी उद्योजकांच्या कल्पकतेची जोड मिळाल्यावर, तंत्रज्ञानाचा शिक्षणावर अनेक प्रकारे परिणाम होईल हे निश्चित. आर्टिफिशियल इंटेलिजन्स, मशीन लर्निंग, ब्लॉक चेन्स, स्मार्ट बोर्डस, हस्त चलित (हँडहेल्ड) कंप्युटिंग डिवायसेस, विद्यार्थ्यांच्या विकासासाठी अडॅप्टीव कंप्युटर टेस्टिंग आणि इतर स्वरुपातील सॉफ्टवेअर आणि हार्डवेअर यासारख्या नवीन तंत्रज्ञानांमुळे विद्यार्थी वर्गात काय शिकतात फक्त यामध्ये बदल होणार नाही तर ते कसे शिकतात यातदेखील बदल होईल.

**नवीन नाविन्यपूर्ण तंत्रज्ञान**

**१.आर्टिफिशियल इंटेलिजन्स**



आर्टिफिश्यल इंटेलिजेंस (Artificial Intelligence) म्हणजेच कृत्रिम बुद्धिमत्ता. कृत्रिम बुद्धिमत्ता बद्दल जॉन मॅककार्थीने जगाला प्रथम सांगितले होते. ते अमेरिकन संगणक वैज्ञानिक होते, त्यांनी 1956 मध्ये डार्टमाउथ कॉन्फरन्समध्ये या तंत्रज्ञानाबद्दल प्रथम सांगितले. आर्टिफिश्यल इंटेलिजेंस हे टॉप टेक्नॉलजीमध्ये पहिल्या क्रमांकावर येते. आर्टिफिश्यल इंटेलिजेंस म्हणजेच एखाद्या मशीनमध्ये माणसाप्रमाणे विचार करू शकण्याची, समजू शकण्याची व निर्णय घेण्याची क्षमता विकासीत करणे. या टेक्नॉलजीमध्ये असा मेंदू बनवला जातो जो मानवाप्रमाणे विचार करू शकेल, निर्णय घेऊ शकेल.

आर्टिफिश्यल इंटेलिजेंसचा वापर टेक्स्ट मायनिंग (Text Mining), वेब मायनिंग(Web Mining), हेल्थकेअर, बँकिंग, एंटरटेंमेंट, सेल्फ ड्रायविंग कार, स्मार्टफोन पासून ते घर सर्व जागी होऊ लागला आहे. सौदी अरेबियाची रोबोट सोफिया ती सुद्धा एक आर्टिफिश्यल इंटेलिजेंस आहे. काही काम अशी आहेत जी फक्त आर्टिफिशिअल इंटेलिजन्सच्या सहाय्यानेच केली जाऊ शकतात जसे की अंतरिक्ष स्टेशनची निर्मिती, चंद्र, व मंगल मिशन, खोल समुद्रामध्ये प्राकृतिक गॅस, पेट्रोलियम व खनिजे व अन्य प्रकारच्या संशोधनांचा शोध लावण्यासाठी AI चा उपयोग होतो.

**आर्टिफिश्यल इंटेलिजेंसचा उपयोग खालील काही एप्लिकेशनमध्ये केला जातो**

1. कम्प्यूटर गेमिंग (Computer gaming)
2. नॅच्युरल लँग्वेज प्रोसेसिंग (Natural Language Processing)
3. एक्सपर्ट सिस्टम (Expert System)
4. इंटेलिजेंट रोबोट (Intelligent Robot)
5. स्पीच रेकॉगनायझेशन (Speech Recognization) इत्यादि.

**शिक्षणात (Ai) चा उपयोग**

AI च्या मदतीने स्वयंचलित ग्रेडिंग करता येईल जेणेकरून शिक्षकांना मुलांना वाचण्यासाठी जास्त वेळ मिळेल. AI च्या मदतीने कोणत्याही विद्यार्थ्याची चांगल्या प्रकारे तपासणी केली जाऊ शकते, कोणत्या गोष्टींची आवश्यकता आहे, कोणते विषय कमजोर आहेत इत्यादी जेणेकरून विद्यार्थ्यांस योग्य मार्गाने मदत करता येईल. आजकाल एआय ट्यूटर्सच्या मदतीने विद्यार्थी घरातून प्रत्येक गोष्टीवर तोडगा शोधत आहेत. यामुळे त्यांच्या वाचनाची आवडही वाढत आहे.

**२.मशीन लर्निंग**




मशीन लर्निंग म्हणजे एखादी गोष्ट घडण्याची शक्य तितकी अचूक भाकीत करणे. मशीन किंवा संगणक समस्या सोडवते तेव्हा त्या प्रकारास मशीन लर्निंग म्हणतात. अर्थर सॅम्युअल यांनी सर्वात आधी 1959 मध्ये मशीन लर्निंग चा विचार

**शिक्षण क्षेत्रातील मूलभूत व विशिष्ट अप्लीकेशन सॉफ्टवेअर्स -**

१. वर्ड प्रोसेसर्स -

शिक्षण क्षेत्रामध्ये कार्यालयीन व शैक्षणिक अशा दोन्ही पातळीवर याचा उपयोग होतो. विविध प्रकारचे अर्ज, पत्रे, मोज, फॅक्स,माहितीपुस्तिका, अहवाल, वेळापत्रके तयार करण्यासाठी वर्ड प्रोसेसर्स उपयुक्त ठरते.

२. स्प्रेडशीटस् -

विद्यार्थी आणि शिक्षक ग्रेड पॉईंट मोजण्यासाठी स्पेडशीटचा वापर करतात. शिक्षणक्षेत्रातील कामध्ये पेडशीट अत्यंत उपयोगी व गरजेचे ठरले आहे. मायक्रोसॉफ्ट एक्सेल का सर्वाधिक वापरला जाणारा स्पेडशीट प्रोगम आहे.

३. डेटाबेस मैनेजमेंट सिस्टीम -

विद्यार्थ्यांची प्राध्यापकांचा अभ्यासक्रमाची ग्रंथालयातील पुस्तकांची यादी इत्यादी अनेक नांदी ठेवण्यासाठी माहाविद्यालये आणि विद्यापीठे याचा उपयोग करतात

४. प्रेझेंटेशन ग्राफिक्स -

माहिती आकर्षक स्वरूपात सादर केली तर विद्यार्थी अधिक परिणामकारकतेने शिकतात,. यामध्ये अनेक दृष्ये एकत्र करून एक आकर्षक पेझेंटेशन तयार करता येते. आकर्षक प्रभावी व्यावसायिक किंवा शैक्षणिक प्रेझेंटेशन तयार करण्यासाठी याचा वापर होतो. वर्गामध्ये उत्तम दर्जाचे संप्रेषण (Communication) साधण्यासाठी या प्रोग्नस्चा वापर अत्यंत उपयुक्त ठरतो.

**समारोप**

शिक्षणात तंत्रज्ञानाचा वापर हे केवळ साध्य नाही तर एक प्रवास आहे. शिक्षण व्यवस्थेत अनिवार्यपणे परिवर्तन घडवणाऱ्या उदयोन्मुख क्रांतिकारी तंत्रज्ञानांकडे विशेष लक्ष देणे आवश्यक आहे. शिक्षणाच्या विविध पैलूंमध्ये सुधारणा करण्यासाठी, तंत्रज्ञानाच्या वापराला आणि एकात्मीकरणाला पाठिंबा देऊन त्याचा अवलंब केला पाहिजे.

**संदर्भसूची -**

1. प्रशांत पाटील शैक्षणिक तंत्रविज्ञान आणि व्यवस्थापन, नित्य नूतन प्रकाशन पुणे, 2008
2. मीनाक्षी वरचे, माधवी धारणकर : शिक्षणात संगणक आणि माहिती संप्रेषण तंत्रविज्ञान, नित्य नूतन प्रकाशन पुणे, 2009
3- सीमा येवले (संपादक) : शैक्षणिक तंत्रविज्ञान आणि माहिती तंत्रविज्ञान, नित्य नूतन प्रकाशन पुणे, 2007
4. ह. ना. जगताप शिक्षणातील नवप्रवाह व नवपवर्तने, नित्य नूतन प्रकाशन पुणे, 2008
5. Timothi. J. Oliary & Linda I. Oliary : Information Technology, Published by Tata McGraw Hill Education Private Limited, New Delhi, 2011

IQAC Co-ordinator
Chhatrapati Raje Sambhaji
College of Education,
Jalgaon

PRINCIPAL
Chhatrapati Raje Sambhaji
College of Education
Jalgaon

Krida Rasik Education Society's

**ADV. SITARAM (BABANBHAU) AANANDRAMJI BAHETI ARTS, COMMERCE & SCIENCE COLLEGE, JALGAON (M.S.).**

(Affiliated to North Maharashtra University, Jalgaon (M.S.)

# Certificate

This is to certify that ~~Prof.~~/Dr. Avint S. Patil

has participated as a Delegate/Resource Person in the conference and submitted a Research paper entitled महाविद्यालयीन शिक्षकांच्या कार्यक्षमतेवर परिणाम करणारे घटक. on **Multidisciplinary National Conference on Motivational Techniques for University & College Teacher's** held on 19th March, 2018.

| | | | |
|---|---|---|---|
| **Mr. S. T. Patil**<br>(Convener) | IQAC Co-ordinator<br>Chhatrapati Raje Sambhaji<br>College of Education,<br>Jalgaon | PRINCIPAL<br>Chhatrapati Raje Sambhaji<br>College of Education<br>Jalgaon | **Dr. Anil Lohar**<br>(Principal Organiser) |

Indian Council of Social Science Research

**Arunodaya Dnyan Prasarak Mandal's**

# Women's College of Arts, Commerce & Home Science, Jalgaon

*(Affiliated to SNDT Women's University, Mumbai)*

NAAC Re-Accredited 'B' Grade (CGPA - 2.29)

**Department of English and IQAC organise**

## One Day Interdisciplinary National Seminar

On

## The Status of Disability Studies: Film and Literature

Sponsored by

***Indian Council of Social Science and Research (ICSSR), New Delhi***

# Certificate

This is to certify that **Dr. Avint S. Patil,** S.S.P.M's College of Education (B. Ed.), Tehu, Parola has actively participated/contributed/presented a Research Paper entitled **'अपंगत्व आणि पुर्नवसन'** in **One Day Interdisciplinary National Seminar** on **'The Status of Disability Studies: Film and Literature'** held on Saturday, 29 February 2020.

| | | |
|---|---|---|
| **Dr. Somnath Lokare** | **Prof. Yunus Shaikh** | **Dr. Jayashri Nemade** |
| **CONVENER** | **ORGANISING SECRETARY** | **PRINCIPAL** |

IQAC Co-ordinator
Chhatrapati Rajo Sambhaji
College of Education,
Jalgaon

PRINCIPAL
Chhatrapati Raje Sambhaji
College of Education
Jalgaon



**SHRI SHIVAJI SHIKSHAN PRASARAK MANDAL'S,**

## COLLEGE OF EDUCATION, BARSHI

DIST. SOLAPUR, MAHARASHTRA, INDIA

IQAC, College Of Education, Barshi

**ORGANIZED**

**IN COLLABORATION WITH**

**PUNYASHLOK AHILYADEVI HOLKAR SOLAPUR UNIVERSITY, SOLAPUR**

**ONLINE INTERNATIONAL CONFERENCE**



# CERTIFICATE

THIS IS TO CERTIFY THAT PROF./ DR./ASSO. PROF. /ASSIST. PROF./ SHRI / SMT. Patil Madhuri Devidas OF Shri.Chhatrapati Raje Sambhaji B.Ed. College ,Jalgaon. HAS PARTICIPATED IN ONLINE INTERNATIONAL CONFERENCE ON **"RECENT TRENDS IN HIGHER EDUCATION "** HELD AT SHRI SHIVAJI SHIKSHAN PRASARAK MANDAL'S COLLEGE OF EDUCATION, BARSHI ON 22ND NOVEMBER, 2022.

| Dr.M.V.Mate | Prof.Dr.A.G.Kamble | Prof.Dr.V.P.Shikhare | Dr.S.S.Gore |
|---|---|---|---|
| Co-Convener | Convener | IQAC Coordinator | Principal |

Made for free with Certify'em